# मालेगाव महानगर पालिका, मालेगाव
## सार्वजनिक बांधकाम विभाग
## निविदा सुचना क्र. २७/२०२३-२४

मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव हे मनपा निधी अंतर्गत खालील कामांची निविदा सार्वजनिक बांधकाम विभागा कडील पाकीट पध्दतीने मागविणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलन रक्कम | बयाणा रक्कम | फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | गणेश उत्सवा निमित्त तात्पुरत्या गणेश कुंडाजवळ मंडप उभारणे बाबत निविदा मागविणे.(पाकिट पध्दतीने) | 1,47,913/- | 1479/- | 550+99= 650 | ११ दिवस |

| | |
|---|---|
| निविदा प्रसिध्द दिनांक | दिनांक ०५ /१२ /2023 दुपारी 15.00 |
| कोरे निविदा प्रपत्र विक्री | दिनांक ०५ /१२ /2023 दुपारी 15.00 ते दिनांक १२ /१२ /2023 दुपारी 17.00 वाजे पर्यंत |
| निविदा प्रपत्र दाखल करणेचा दिनांक | दिनांक ०५ /१२ /2023 दुपारी 15.00 ते दिनांक १२ /१२ /2023 दुपारी 17.00 वाजे पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक १३ /१२ /2023 ( सकाळी 11.00 वा. नंतर शक्य असल्यास ) |

निविदेचा तपशिल मालेगाव महानगापालिकेची वेबसाईट https//www.malegaoncorporation.org वर सुध्दा उपलब्ध आहे.

**महत्वाचे:**

1) सर्व अटी/शर्ती इंटरनेट वर उपलब्ध आहेत.
2) निविदा सादरीकरण हे दोन लिफाफा पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे.
3) कोणतेही निविदा स्विकारणेचा या नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका ने राखुन ठेवला आहे.
4) मा. उपायुक्त (वि) यांनी सुचविलेल्या अटी/शर्ती व मार्गदर्शक सुचनानुसार काम करणेस मक्तेदार बंधनकारक राहील.

टेक्निकल बिड साठी आवश्यक कागदपत्रे

1) वरील नमुद कामासाठी संस्था नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत.
2) वरील नमुद कामासाठी साठी जी.एस.टी क्र. बाबत कागदपत्र
3) वरील नमुद कामासाठी पॅन कार्ड क्रमांक बाबत कागदपत्र.

**टिप:** 1) मालेगाव महानगरपालिकेने ज्या मक्तेदारांची नावे मक्तेदारांच्या काळया यादीत टाकलेले आहेत त्या काळया यादीतील मक्तेदारांनी निविदा दाखल केल्यास त्यांचे निविदा उघडता येणार नाही. 2) निविदेत प्राप्त दर हे अंतिम राहिल. एल-2 मक्तेदाराचे पत्रावर विचार केला जाणार नाही. या बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांनी राखुन ठेवले आहे.

**निविदा देकार प्राकलनापेक्षा कमी दराच्या असल्यास ?**

1 **देकार 15 टक्के पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्मेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी. द्वारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. 19 टक्के कमी दरा साठी खालीलप्रमाणे पृथः करण**

**10% टक्के कमी दरापर्यंत** 1 %

**15% पर्यंत कमी दरापर्यंत** – ( 15 % - 10 % = 5 %)

**तसेच** (19 – 15) = 4 % **करीता** ( 4 X 2 =) 8%

**असे एकूण** (1+5+8) = 14 %

**वरील प्रमाणे निविदाकारांनी प्राकलनापेक्षा कमी दराच्या निविदेसाठी डी.डी. (Additional Performance Security Deposit म्हणून) स्कॅन करून निविदा दरपत्रकासह अपलोड करावे.**

कमी दराच्या निविदा दरा बाबत शासन परीपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ अन्वये तंतोतत लागु राहील.

अ धनाकर्ष मा. आयुक्त यांच्या नावे असावा.

ब धनाकर्ष सरकारी किंवा राष्ट्रीय कृत शेडयुल्ड बँकांकडून काढलेला असावा.

क धनाकर्ष सिलबंद लिफाफया मधून कंत्राटदारांनी लिफाफा क्र. 02 उघल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L-1निविदाकाराने (Additional Performance Security Deposit) दिनांकापासुन 08 दिवसाच्या आत उप

अभियंता सा.बा.विभाग किंवा शहर अभियंता, म. न. पा मुख्य कार्यालयात जमा करावा.

फ **लिफाफ्यावर कामाचे नाव व निविदासूचना क्रमांक लिहिण्यात यावा.**

4 वरील पध्दती मध्ये खोटी कागदपत्रे धनाकर्ष सादर करण्याव्या कंत्राटदारांची अनामत रक्क (EMD)जप्त करण्यात येईल व संबंधित ठोकेदारांची नोंदणी । वर्षासाठी स्थगित करण्यात येईल. यासाठी मा. आयुक्त यांना पुर्ण अधिकार राहतील.

5 निम्नतम निविदाकाराकडून प्राप्त धनाकर्ष वटविल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

6 काम समाधानकारकपणे पुर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदी प्रमाणे ठेकेदारांकडून प्राप्त परर्फामन्स सिक्युरिटीची रक्कम 3 महिन्याचा आत कंत्राटदारांना परत करणेची कार्यवाही करण्यात येईल.

## अटी / शर्ती

1) मनपाच्या विकास कामांचे कार्यादेश देवूनही ज्या मक्तेदारांनी विहित कालावधीत कामे सुरु केलेले नाही अशा तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे प्रलंबित असलेल्या मक्तेदारांनचा निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

2) निविदे बाबतच्या अटी शर्ती निविदा प्रपत्रा सोबत पहावयास मिळतील.

3) कोणतेही काम मुळ कामाच्या 10% पेक्षा जास्त वाढत असल्यास वाढीव कामाला फेर अंदाजपत्रक, फेर टेंडर काढण्यात येईल.

4) काम मिळाल्यानंतर संबधीत ठेकेदारास कामाचा व कामावरील कामगारांचा विमा शासकिय विमा संचालकांकडून उतरावा लागेल.

5) मक्तेदाराने कामाचे मुदतीत काम पुर्ण करणे बंधनकारक राहील. मुदतीत/वाढीव मुदतीत काम पुर्ण न केल्यास करारनाम्यात निर्धारीत केल्या प्रमाणे दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल.

6) कामावर बाल कामगार लावता येणार नाही.

7) कामगारांना किमान वेतन देणे.

8) कामगारांना सुरक्षिततेची पूर्ण व्यवस्था मक्तेदारांनी स्वतः करावी.

9) लेबर अकॅटच्या सर्व अटी / शर्ती चे पालन करणे मक्तेदारांना बंधनकारक राहील. या अटी/शर्ती बाबत मक्तेदारांची लेबर आफिस यांचे कडून स्वतः माहिती घ्यावी.

10) कामाचे कार्यादेश दिल्यावर मक्तेदाराने कामाची परिस्थिती, परिमाण,किंमत इत्यादी माहिती शासकिय लेबर आफिसर यांना देऊन वरील कामासाठी 20 किंवा 20 पेक्षा जास्त कामगारांसाठी बंधनकाराक राहिल.

11) मक्तेदाराच्या प्रत्येक बिलातून 1 टक्के प्रमाणे कामगार कल्याणकारी उपकर ची रक्कम कपात करण्यात येईल.

12) सदरची निविदा सुचना वेबसाईटवर उपलब्ध असून तयाचा संकेतांक https//www.malegaoncorporation.org असा आहे.

13) गौण खनीजावर भरावा लागणारा कर तहसीलदार,मालेगाव यांचे कडे ठेकेदारास भरावा लागेल. या बाबत मनपा जबाबदार राहणार नाही.

14) अटी युक्त निविदा विचारात घेतला जाणार नाही.

15) कोणत्याही कामाला शक्यतो मुदतवाढ दिली जाणार नाही.

16) मनपाची आर्थिक परिस्थित पहाता निधी उपलब्धतेनुसार प्रथमक्रमाने देयके अदा करणे बाबत विचार केला जाईल.

17) निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी असल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल.

**उप अभियंता**
सा.बा.विभाग

**शहर अभियंता**
मालेगाव महानगरपालिका

**उप आयुक्त (वि)**
मालेगाव महानगरपालिका

**आयुक्त तथा प्रशासक**
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव